# कोरोना: सर्वत्र खबरदारीच्या उपाययोजना सुरु - मुख्यमंत्री

**विशेष प्रतिनिधी**



मुंबई, बुधवार - राज्यामध्ये आढळून आलेल्या कोरोनाच्या रुग्णांची प्रकृती स्थिर असून त्यांना निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी भीती बाळगण्याची आवश्यकता नाही, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज स्पष्ट केले.

आरोग्य विभागासह विमानतळ, बंदरे, रेल्वेस्थानकांवरही आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे. नागरिकांनी सार्वजनिक कार्यक्रमांना गर्दी करणे टाळावे. शाळा, महाविद्यालये तसेच धार्मिक कार्यक्रमांबाबत धोरणात्मक निर्णय घेतानाच खासगी रुग्णालयातील विशेषज्ञांनी यासंदर्भात सर्वसामान्यरित्या अवलंबवायची कार्यपद्धती तातडीने तयार करावी. जनजागृती करण्यासाठी सर्व गावांमध्ये ग्रामसभा घेण्यात याव्यात, अशा सूचनाही ठाकरे यांनी दिल्या.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी विधानभवनात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्य मंत्री राजेश टोपे, अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, राज्यमंत्री राजेंद्र पाटील, माजी आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत, रेल्वे, बंदरे, विमानतळ प्राधिकरण, खासगी रुग्णालयातील विशेषज्ञ, विविध विभागांचे अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे पुणे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याशी संवाद साधून पुणे येथील परिस्थितीबीबत माहिती घेतली. पुणे येथील नायडू रुग्णालयात विलगीकरणाची सुविधा असून गरज पडल्यास पिंपरी चिंचवड येथील नवीन रुग्णालयात देखील विलगीकरणाची सुविधा करावी. व्हेंटिलेटर्सची उपलब्धता ठेवावी, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. उपचारासाठी आवश्यक असणारी कुठलीही बाब, उपकरणाची आवश्यकता भासल्यास त्याची खरेदी जिल्हा नियोजन खर्चातून खरेदी करावी, माध्यमांना दररोज माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद घ्या, असे निर्देश उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री म्हणाले, 'भारत सरकारने नोव्हेल कोरोना व्हायरस (कोविड-१९) प्रतिबंधाबाबत करावयाच्या उपाययोजना केंद्र सरकारने प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त यांना देण्यात येत आहे. त्यांनी जिल्हाधिकारी, आरोग्य विभाग व इतर आवश्यक विभागांशी समन्वय साधून ही कार्यवाही करावी. 'कोविड-१९' या आजाराबाबत जनजागृती व आरोग्य शिक्षण देण्यासाठी तसेच हात स्वच्छ धुणे, खोकताना- शिंकताना घ्यावयाची काळजी, खोकणाऱ्या, शिंकणाऱ्या व्यक्तीपासून तीन फूट अंतर ठेवणे असे महत्त्वाचे संदेश देण्यासाठी जनजागृती करण्यासाठी बस स्टँड, एसटी पॅनेल, होर्डींग्ज्, दूरदर्शन, रेडिओ अशा विविध माध्यमांचा प्रभावीपणे वापर करावा, असं आवाहनही त्यांनी केलं.

कोरोना चाचणी सकारात्मक आलेल्या व्यक्तींच्या संपर्कातील जास्त जोखमीच्या व्यक्तींची चाचणी करावी. तसेच कमी जोखमीच्या व्यक्तींनी १४ दिवस घरीच थांबण्यास सांगावे, अशा व्यक्तींच्या घराभोवतालच्या ३ किमी अंतरातील सर्वांची आरोग्य तपासणी करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. गाव पातळीवर करोना विषाणू आजाराच्या संदर्भात मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यासाठी सर्व गावांमध्ये ग्रामसभा घ्याव्यात. त्या माध्यमातून या आजाराच्या प्रतिबंधासाठी करावयाची कार्यवाहीबाबत माहिती द्यावी, असेही त्यांनी सांगितलं.

प्रयोगशाळा तपासणी करण्यासाठी खासगी प्रयोगशाळांना मान्यता देण्यासाठी केंद्र शासनास विनंती करण्यात येईल व त्यासाठीचा पाठपुरावा राज्य शासनामार्फत करण्यात येईल. रुग्णांचे स्क्रीनिंग, संशयीत रुग्णांच्या प्रयोगशाळा चाचण्या आणि आरोग्य शिक्षण या बाबींसाठी स्टँडर्ड ऑपरेटींग प्रोटोकॉल खासगी रुग्णालयातील विशेषज्ञांनी तयार करून सार्वजनिक आरोग्य विभागास सादर करावेत, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. सर्व टूर ऑपरेटरनी परदेशातून येणाऱ्या प्रवाशांची माहिती द्यावी आणि त्यापैकी एखाद्या प्रवाशास ताप, खोकला असल्यास त्वरित आरोग्य विभागाशी संपर्क साधावा, अशा सूचना पर्यटन विभागाला दिल्या.


**पश्चिम रेल्वे**

विविध कामे

**निविदा सूचना क्र. आणि तारीख:** बीसीटी/१९-२०/४२६. दि. ०९.०३.२०२०. **काम आणि ठिकाण:** पावसाळी कामाशी संबंधित डीएन टेक पाईप, क्रॉस ड्रेनेज आणि व्हॅली गटर ला एसटीसी-व्हीआर अनुभागात दुरुस्ती. **कामाचा अंदाजित खर्च:** रु. ३,३५,८६,०४४.८३. **इ.अ.र.:** रु. ३,१७,९००/-. **सादर करण्याची तारीख आणि वेळ: १३.०४.२०२० रोजी दु. ३.०० वा. पर्यंत. उघडण्याची तारीख व वेळ: १३.०४.२०२० रोजी दु. ३.३० वा.** कामाचे सविस्तर स्वरुप, निविदा दस्तावेजाची किंमत (विना परतावा), इ.अ.र. पात्रता निकष, समान स्वरुपाचे काम, तपशीलवार निविदा शर्ती यासाठी कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्या. प्रत्यक्ष प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

आम्हाला लाईक करा facebook.com/WesternRly



**मध्य रेल्वे**

**वाहन भाड्याने घेणे**

**निविदा क्र. बीवाय.एन.जी. ट्रान्सपोर्टेशन १.५ एमटी गुडस् व्हेईकल्स/२०१९.** सीडब्ल्यूएम/बीवाय हे दोन वर्षाच्या कालावधीकरिता माल प्रेषिती/एस अँण्ड टी वर्कशॉप भायखळा यांच्या माल/कच्च्या मालाच्या वाहतुकीकरिता १.५ एम.टी. गुडस् व्हेईकल भाड्याने घेण्यासाठी ई-निविदा एजन्सीज मार्फत खुली ई-निविदा मागवित आहे आणि **कामाचा अंदाजे खर्च:** रु. ८,७६,१६८/-. **इसारा अनामत रक्कम:** रु. १७५००/- **निविदा दस्तावेजांची किंमत:** रु. २०००/-, **पूर्तता कालावधी:** २४ महिने, **प्रस्तावाची वैधता:** उघडल्याच्या तारखेपासून ४५ दिवस. **निविदा सादर करणे बंद होण्याची तारीख:** ०६.०४.२०२० रोजी स. ११.०० पर्यंत. **कामाची सुरूवात:** प्रभारी अभियंत्यानी सांगितल्यानुसार. **कालावधी:** सुरु होण्याच्या विहित तारखेपासून ०२ वर्ष, (पुढील वाढ ६ महिन्यासाठी). **पात्रता निकष:** सर्व्हिसेसाठी जीसीसी च्या खंड २.६.१ मध्ये नमूद नुसार. **निविदा दस्तावेजावर स्पष्टिकरण मिळविण्यासाठी प्राधिकरण आणि ठिकाण:** चीफ वर्कशॉप मॅनेजर, सिग्नल आणि टेलिकॉम वर्कशॉप, मध्य रेल्वे, भायखळा, मुंबई ४०००२७. निविदा नियोजन आणि निविदा सूचना वेबसाईट **www.ireps.gov.in** वरून डाऊनलोड करता येईल.

1353

आरपीएफ सिक्युरिटी हेल्पलाईन १८२



**मध्य रेल्वे**

**सॅन्ड बॉक्सेसमध्ये सुकी गाळलेली वाळूचा पुरवठा, परिवहन, लादणे उतरवणे, साठा करणे आणि भरणे.**

**निविदा क्र. बी/टीआरएसओ/सॅन्ड फिलिंग/२०-२२ कामाचे नाव:** दोन वर्षाच्या कालावधीकरिता (७३० दिवस) उपनगर आणि उपनगर नसलेल्या एरियामध्ये क्रू बदलणाऱ्या ठिकाणांच्या ईलेक्ट्रिक/डिझेल रेल्वे इंजिनाच्या सॅन्ड बॉक्सेस मध्ये सुकी गाळलेली वाळू भरणे आणि पुरवठा, परिवहन, लादणे, उतरवणे, साठा करणे आणि सॅन्डर कामाची तपासणी आणि ईलेक्ट्रिक/डिझेल इंजिन सॅन्ड गिअर्सची दखल घेणे: **ठिकाण:** मुंबई विभाग, **अंदाजित मूल्य:** रु. १३,८९,१०,३६८/-, **इसारा अनामत रक्कम:** रु. ८,४४,६००/-, **निविदा प्रपत्राची किंमत:** रु. १०,०००/-, **पूर्तता कालावधी:** ०२ वर्षे, **कार्यालयाचा पत्ता:** सिनि. डीईई (टीआरएसओ) बीबी, २रा मजला, ॲनेक्स बिल्डिंग, रिझर्वेशन सेंटरच्यावर, मध्य रेल्वे, मुंबई सीएसएमटी, **निविदेच्या समाप्तीची तारीख:** ३०.०३.२०२०, स. ११.०० वा. **जेथून निविदा डाऊनलोड करता येईल ती वेबसाईट: www.ireps.gov.in**

1348

आरपीएफ सुरक्षितता हेल्पलाईन-१८२


## उद्धव ठाकरे यांना काँग्रेस-राष्ट्रवादीने घेरलेय

**- रामदास आठवले**



मुंबई, बुधवार (विशेष प्रतिनिधी) - मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना काँग्रेस-राष्ट्रवादीने घेरले आहे. त्यांना निर्णय घेताना अडचणी येत आहेत. त्यामुळे ते महायुतीमध्ये परत येतील आणि महाराष्ट्रात मध्य प्रदेशची पुनरावृत्ती होईल,' असा दावा रिपब्लिकन नेते रामदास आठवले यांनी व्यक्त केला आहे.

मध्य प्रदेशातील राजकीय भूकंपाच्या पार्श्वभूमीवर ते मीडियाशी बोलत होते. 'मध्य प्रदेशप्रमाणे महाराष्ट्र, राजस्थान आणि छत्तीसगडमध्येही सत्ताबदल होईल. महाराष्ट्रात पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार येईल,' असे आठवले म्हणाले. महाविकास आघाडी सरकारबद्दल बोलताना ते म्हणाले, 'उद्धव ठाकरे प्रचंड काळजीत आहेत. सरकारमध्ये निर्णय घेताना त्यांना अडचणी येत आहेत. त्यामुळे ते परत येतील. मात्र, ते परत आले नाही तरी त्यांचे आमदार आमच्याकडे येतील व भविष्यात आमचे सरकार येईल.'

मध्य प्रदेश काँग्रेसचे दिग्गज नेते ज्योतिरादित्य शिंदे यांच्यासह १९ आमदारांना फोडून भाजपने काँग्रेसला जोरदार धक्का दिला आहे. भाजपच्या या खेळीमुळे मध्य प्रदेशातील काँग्रेस सरकार कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता आहे. या घडामोडींनंतर महाराष्ट्रातही भाजप अशाच पद्धतीचं ऑपरेशन राबवणार असल्याची चर्चा आहे. भाजप नेते व समर्थकांकडून तशी सूचक वक्तव्य केली जात आहेत. आठवले यांनीही त्यांच्याच सुरात सूर मिसळला आहे.

# क्रिस्टल मॉल आणि लक्ष्मी प्लाझा यांनी भरले १ कोटी ९१ लाख

## वांद्रे आणि अंधेरी पश्चिम भागातील गाळेधारकांवर धडक कारवाई

## मालमत्ताकर न भरणाऱ्यांवर महापालिकेची मोहीम सुरूच

**प्रतिनिधी**



मुंबई, बुधवार - आपल्या परिसरातील मालमत्ता कर न भरणाऱ्यांविरोधात पाणी पुरवठा खंडीत करण्याशिवाय यंदा प्रथमच अधिक कठोर पावले उचलणाऱ्या महापालिकेने थकबाकीदारांची वाहने, फर्निचर, टीव्ही, फ्रीज आदी वस्तू जप्त करण्यास गेल्या काही दिवसांपासून सुरुवात केली आहे. याच अनुषंगाने 'एच पश्चिम' विभागातील क्रिस्टल पॅराडाईज शॉपर्स मॉल आणि अंधेरी पश्चिमच्या लक्ष्मी इंडस्ट्रीयल इंस्टेटमधील मालमत्ता कर थकवणा-या गाळ्यांवर धडक कारवाई सुरु करताच ते जागे झाले. परिणामी, क्रिस्टल पॅराडाईज शॉपर्स मॉलमधील १६७ गाळेधारकांनी लगेच सुमारे रुपये १ कोटी ७८ लाखांचे धनादेश पालिकेच्या स्वाधीन केले. तर अंधेरीच्या लक्ष्मी इंडस्ट्रीयल इंस्टेटमधील लक्ष्मी प्लाझा या गाळेधारकाने रुपये साडे बारा लाखाचा भरणा ताबडतोब पालिकेकडे केला, अशी माहिती महापालिकेच्या कर निर्धारक व संकलक खात्याद्वारे देण्यात आली.

वांद्रे पश्चिमच्या लिकिंग रोडवर असलेल्या क्रिस्टल पॅराडाईज शॉपर्स मॉलमधील गाळेधारकांकडे मालमत्ता करापोटी रुपये ४ कोटी ८ लाख थकबाकी होती. तर लक्ष्मी प्लाझा या गाळेधाराकाकडे रुपये २५ लाखाची थकबाकी होती. महापालिकेच्या नियमांनुसार अनेकदा नोटीस बजावून व वारंवार सूचना देऊन देखील कंपनी कर भरायला टाळाटाळ करीत होती. परंतु, त्यांची चल संपत्ती जप्त करण्याची प्रक्रिया सुरु करताच क्रिस्टल मॉलमधील १६७ गाळेधारकांनी पटापट १ कोटी ७८ लाखाचे धनादेश पालिकेच्या अधिका-यांकडे सुपूर्द केले. तर लक्ष्मी प्लाझाच्या मालकानेही २५ लाखांपैकी साडे बारा लाखाचा धनादेश लगेच देऊन आपली सुटका करुन घेतली. दोन्ही ठिकाणी उर्वरित मालमत्ताकराचा भरणाही लवकरच करण्याची हमी देण्यात आली आहे.

नागरिकांना विविध नागरी सेवा-सुविधा अव्याहतपणे देणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे जमा करावयाचा मालमत्ता कर भरावयास टाळाटाळ करणाऱ्यांवर महापालिकेची धडक कारवाई गेल्या काही दिवसांपासून नियमितपणे सुरू आहे. या कारवाई अंतर्गत महापालिकेच्या सव्वाशे वर्षांच्या इतिहासात यंदा प्रथमच चल संपत्ती जप्त करण्याची कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार महापालिका क्षेत्रात मालमत्ताकर थकबाकीदारांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. वाहन वा इतर वस्तू जप्ती सारखी अप्रिय कारवाई होऊ नये, यासाठी मालमत्ता कर थकबाकी दारांनी शेवटच्या तारखेची वाट न बघता मालमत्ता कर तातडीने महापालिकेकडे जमा करावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाने द्वारे करण्यात येत आहे.

## बोरिवलीत शनिवारी कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा

मुंबई, बुधवार (प्रतिनिधी) - जागतिक महिला दिन आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती हे दोन्ही महत्वपूर्ण दिवस संयुक्तरित्या साजरे व्हावेत यादृष्टीने बोरीवली येथील स्त्री सन्मान महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेच्या अध्यक्षा सौ. रेखाताई बोऱ्हाडे यांनी शनिवार, १४ मार्च २०२० रोजी वैश्य वाणी समाज सभागृह, दत्तपाडा रोड, बोरीवली (पूर्व) येथे सायंकाळी ५ वाजतां एका कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. कर्तृत्ववान महिलांचा सन्मान या कार्यक्रमात करण्यात येणार आहे. पुणे येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सौ. विद्या म्हात्रे, बोरीवली येथील गोखले महाविद्यालयाच्या प्राचार्य श्रीमती सुहासिनी संत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. शोभना पिसे, शिव व्याख्यात्या सौ. वनिता साबळे, डॉ. वैशाली सावंत, लावणी क्वीन सौ. देवयानी चंदगडकर, क्रीडापटू कु. हर्षिता राकेश वायंगणकर या विविध क्षेत्रातील मान्यवर महिला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या आगळ्यावेगळ्या समारंभात मोठ्या संख्येने महिलांनी उपस्थित राहून बहुमोल मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन सौ. रेखाताई बोऱ्हाडे यांनी केले आहे.


IDBI BANK

**निविदा सूचना**

**नों. पत्ता :** आयडीबीआय टॉवर, डब्ल्युटीसी कॉम्प्लेक्स, कफ परेड, मुंबई - ४००००५
**वेबसाईट :** www.idbibank.in, **सीआयएन नं :** एल६५१९०एमएच२००४जीओआय१४८८३८

**सिम्युलटेड लेदर बॅग्ज आणि २ इन १ सिम्युलटेड लेदर गिफ्ट बॉक्सेस च्या पुरवठ्यासाठी विक्रेत्यांच्या पटनोंदणीसाठी प्रस्तावाकरिता विनंती (आरएफपी)**

आयडीबीआय बँक लि. **सिम्युलेटेड लेदर बॅग्ज आणि २ इन १ सिम्युलेटेड लेदर गिफ्ट बॉक्सेसच्या** सुस्थापित आणि ख्यातनाम उत्पादक/पुरवठादारांकडून मोहोरबंद निविदा मागवित आहे. निविदा सादर करण्यासाठी अंतिम तारीख आहे ०३ एप्रिल, २०२० दु. ०३.०० वा. पर्यंत तपशिलांसाठी कृपया बँकेची वेबसाईट **https://www.idbibank.in/notices.asp** ला भेट द्यावी.
**टीप :** वरील निविदेच्या संबंधातील पुढील कोणतीही पुरकपत्रे/शुद्धिपत्रे/तारखांची मुदतवाढ/स्पष्टीकरणे/बोलीदारांच्या चौकशीला प्रतिसाद केवळ बँकेची वेबसाईट www.idbibank.in वर प्रदर्शित केले जाईल आणि वर्तमानपत्रात कोणतीही वेगळी अधिसूचना जारी केली जाणार नाही. म्हणून बोलीदारांनी ह्या बाबतीत स्वतःला अवगत ठेवण्याकरिता कृपया नियमितपणे बँकेच्या वेबसाईटला भेट घ्यावी.

**दिनांक :** १२.०३.२०२० **सही/-**
**ठिकाण :** मुंबई **प्राधिकृत स्वाक्षरीकार**



**निविदा**

आयुर्विद्या प्रसारक मंडळ संचालित आयुर्वेद महाविद्यालय व शेठ र. व. आयुर्वेदीय रूग्णालय, शीव, मुंबई-२२ साठी सन २०२०-२०२१ या कालावधीकरिता खालील वस्तूंचा/औषधांचा नियमित स्वरूपात पुरवठा करण्यासाठी विविध पुरवठादारांकडून मोहोरबंद निविदा दिनांक ०३.०४.२०२० पर्यंत मागविण्यात येत आहे. निविदाबाबतच्या वस्तू व औषधांची यादी इत्यादी माहितीचा निविदा फॉर्म प्राचार्य यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळू शकेल. निविदा खालील स्वाक्षरी करणाऱ्याकडे नमूद केलेल्या मुदतीत अगर तत्पूर्वी दोन सीलबंद पाकिटातून सर्व करांच्या दरासह पाठविणे आवश्यक आहे.

१. आयुर्वेदीय औषधांचा पुरवठा
२. ॲलोपॅथीक औषधांचा पुरवठा
३. पॅथॉलॉजी विभागात लागणारी साधन सामुग्री/केमिकल्सचा पुरवठा
४. भोजनशाळेसाठी लागणारे धान्य इ. पुरवठा
५. इलेक्ट्रीक सामान पुरवठा इ.

(वैद्य सं. म. सातपुते)
प्रभारी प्राचार्य,
आयुर्वेद महाविद्यालय, शीव, मुंबई-४०००२२


# दुष्काळ निवारणासाठी काय उपाययोजना केल्या?

**प्रतिनिधी**

- **कारवाईचा अहवाल दोन आठवड्यात सादर करा**
- **उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश**

मुंबई, बुधवार - राज्यातील दुष्काळ परिस्थितीवर मात करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या, असा सवाल उपस्थित करतानाच, अवकाळी पावसामुळे झालेल्या रब्बी पिकाच्या दुष्काळासंदर्भात राज्य सरकारची नेमकी भूमिका काय, अशी विचारणा प्रभारी मुख्य न्यायमूर्ती बी.ची. धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती नितीन बोरकर यांच्या खंडपीठाने राज्य सरकारकडे केली. दुष्काळ निवारण नियमावलीनुसार गेल्या सहा महिन्यात केलेल्या कारवाईचा अहवाल दोन आठवड्यात सादर करा, असा आदेशच राज्य सरकारला दिला.

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये आजही तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. तर अवकाळी पावसामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाल्याने राज्य सरकारने दुष्काळ घोषित करून शेतकऱ्यांना पीक विमा व अन्य लाभ द्यावेत, अशी मागणी करणारा अर्ज सामाजिक कार्यकर्ता डॉ. संजय लाखे पाटील यांनी हायकोर्टात दाखल केला आहे.

यावर प्रभारी मुख्य न्यायमूर्ती भूषण धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती नितीन बोरकर यांच्या खंडपीठापुढे आज सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांच्यावतीने ॲड. सतीश तळेकर यांनी राज्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्याच्या रब्बी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. रब्बी पिकांचा दुष्काळ जाहीर करण्यासंदर्भात नियमावली तयार करण्यात आली आहे . त्यानुसार ३१ मार्च २०२० पर्यंत दुष्काळ जाहीर करणे बंधनकारक आहे. गेल्या सहा महिन्यात राज्य सरकारने कोणतेही पाऊल उचलले नाही, असा आरोप केला. राज्य सरकारने हा आरोप फेटाळून लावला. राज्य सरकार २०१८ च्या सुधारीत दुष्काळ निवारण नियमावलीनुसार काम करत असल्याची माहिती सरकारी वकिलांनी न्यायालयाला दिली. याची दखल घेत न्यायालयाने आतापर्यंत दुष्काळ निवारण्यासाठी काय योजना राबविल्या, याचा लेखी तपशील दोन आठवड्यात सादर करा, असा आदेश राज्य सरकारला देऊन याचिकेची सुनावणी तहकूब ठेवली.नैसगिक आपत्ती आणि दुष्काळासंदर्भात सरकारचे उदासिन धोरण यामध्ये गेली पाच वर्षे भरडला जात आहे. शेतकऱ्याला नुकसान भरपाई दिली जात नाही.


**अभिजीत एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा. लि.- परिसमापनात च्या मत्तांच्या संपादनाकरिता स्वारस्याच्या अभिव्यक्ती (ईओआय) करिता आमंत्रण**

**अभिजित एमएडीसी नागपूर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड**
**४ x ६१.५ एमडब्ल्यू पॉवर प्लान्ट नागपूर, महाराष्ट्र**
**[राखीव किंमत: १७५ कोटी]**

इच्छुक अर्जदारांनी आमंत्रणाच्या संदर्भात रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार मात्र) च्या ना-परतावा शुल्कासह ईओआय सादर करावा. ईओआयच्या तपशीलवार अटी आणि शर्तीकरिता http://vinodkothari.com/bankruptcy.code/amnepl/ ला भेट द्यावी/वा **amneplliquidation@gmail.com** येथे मेल करावा.
सेबी नोंदणीकृत मर्चन्ट बॅन्कर्स/परिसमापन/सीआयआरपी/सरफैसी अन्वये मत्तांच्या विक्री यापूर्वीच्या यशापयशाच्या नोंदी सिध्द केलेल्या नामांकित वित्तीय सल्लागारांना परिसमापकाद्वारे प्रस्तावित विक्रीकरिता संभाव्य अर्जदारांना स्वारस्याकरिता प्रवृत्त करता येईल.

**आवश्यक ना-परतावा शुल्कासह, ईओआय स्वीकारण्याची शेवटची तारीख १८.०३.२०२० रोजी सायं. १९.०० पर्यंत आहे.**

**विनोद कुमार कोठारी, परिसमापक**
**अभिजित एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा. लि.- परिसमापनात**
**पत्ता: १००६-१००९, कृष्णा बिल्डिंग,**
**२२४, एजेसी बोस रोड, कोलकाता-७०००१७**
**ईमेल: resolution@vinodkothari.com**
**नोंदणीकरण क्र.: आयबीबीआय/आयपीए-००२/आयपी-एन०००१९/२०१६-१७/१००३३**
**तारीख: ०६.०३.२०२०**


## सार्थ प्रतिष्ठान आणि कॅनाथॉन फाऊंडेशनच्या

# मुंबई हाफ मॅरेथॉनचा विजेता ठरला सर्वेश कुमार

**प्रतिनिधी**




मुंबई, बुधवार - शिवाजी पार्कची रविवार सकाळ भरून गेली होती अबालवृद्ध धावपटूंनी. कारण होते सार्थ प्रतिष्ठान आणि कॅनाथॉन फाऊंडेशन यांच्या वतीने कर्करोगाच्या रुग्णांच्या मदतीसाठी तसेच जनजागृतीसाठी आयोजित करण्यात आलेल्या मुंबई मॅरेथॉनचे. यात सहभागी होण्यासाठी मुंबईसह महाराष्ट्राच्या विविध भागांतील स्पर्धक उत्साहाने यात सहभागी झाले. कॅनथॉनचे हे दुसरे वर्ष असून या वर्षीच्या कॅनथॉन स्पर्धेला अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला जवळजवळ ३ हजार धावपटू या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. स्पर्धेच्या निमित्ताने स्पर्धक तसेच शिवाजी पार्क व परिसरातील नागरिकांचा उत्साह विशेष होता. या मॅरेथॉनचा विजेता होण्याचा मान सर्वेश कुमार यांनी पटकावला तर शर्मिला कदम यांनी महिलांमध्ये बाजी मारली. विशेष म्हणजे महिला दिनाचे औचित्य साधून या स्पर्धेत महापौर किशोरीताई पेडणेकर यादेखील सहभागी झाल्या होत्या.

यावेळी स्पर्धकांना प्रोत्साहित करण्यासाठी खासदार अनिल देसाई, महापौर किशोरीताई पेडणेकर, माजी महापौर महादेव देवळे, संयोजक दिनेश बोभाटे आदी मान्यवर उपस्थित होते. कर्करोगी असणा-यांबद्दल सहानुभूती बाळगा तसेच त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचा विचार मनात ठेवून पुनर्जीवन देण्यासाठी प्रयत्नशील राहा, असा प्रभावशाली संदेश या स्पर्धेच्या निमित्ताने जनमानसात दिला गेला. त्याचा प्रचार व प्रसार करण्याचा उपक्रमाचा मुख्य उद्देश्य होता. स्पर्धेमध्ये कॅन्सरसारख्या आजाराशी यशस्वी लढा देऊन आजारापासून मुक्त झालेले रुग्ण सुद्धा त्या स्पर्धेत सहभागी झाले होते.

विविध गटांतील पहिल्या तीन विजेत्यांची नावे अशी : २१ किमी - १८ ते ४० वर्षे वयोगट - पुरुष - सर्वेश कुमार, अनिल कोर्वी, अविनाश पवार, महिला - शर्मिला कदम, सायली गुप्ते, प्रियांका पैकराव, ४१ वयोगटावरील पुरुष - योईचिरो हिगा, शिवानंद शेट्टी, विजेंद्र नायडू, महिला - मृणाल कुलकर्णी, इती पांडे, रेणू राजगुरू.

१० किमी - १८ ते ४० वर्षे वयोगट - पुरुष - संजय झाकणे, राकेश यादव, विजय गुप्ता, महिला - साक्षी जायदाल, प्रमिला पाटील, रुक्मिणी भौरे, ४१ वयोगटावरील पुरुष - आरबीएस मोनी, किशन कुमार यादव, नोशिर लाला, महिला - इंदु टंडन, पूजा वर्मा, सोई मोहिले - राजमाचीकर,

५ किमी - ८ ते ४० वयोगटातील पुरुष - सनी सिंग, अभिषेक पार्ले, आदित्य म्हात्रे, महिला - प्रियांका नाईक, सुनिता दमाई, रिद्धी लोकेगांवकर, ४१ वयोगटावरील पुरुष - दर्शन मुकादम, हर्षल सावंत, प्रदीप पोफळे, महिला - वॅलेन्टिना डिलामा, नीता फातर्फेकर, प्रार्थना बात्रा.

समाजात खेळाचे महत्व वाढीस लागण्याबरोबरच एक सामाजिक संदेश जावा, त्यासाठी कर्करोगाबाबतच जनजागृती व्हावी तसेच आजारी असलेल्या रुग्णांनाही सहकार्य मिळावे, हा यामागचा हेतू आहे. या स्पर्धेसाठी मिळालेला उत्साह विशेष होता, त्यामुळे आमचा उद्देश्य नक्कीच साध्य होत आहे, तसेच सार्थ प्रतिष्ठान हे सदैव कर्करोगी रुग्णांच्या पाठीशी राहिल, असा विश्वास, खासदार व स्पर्धेचे आयोजक अनिल देसाई यांनी याबाबत बोलताना व्यक्त केले.

सदर कार्यक्रमाकरिता सदा सरवणकर आमदार, माजी महापौर महादेव देवळे, बाळाशेठ खोपडे, समाजसेवक अनुपमा परब, वरळी विधानसभा संघटक वामन भोसले स्था.लो.समिती महासंघ चिटणीस महेश लाड, विमा कर्मचारी सेना एलआयसी युनिट सरचिटणीस राजू पाटणकर उपविभाग प्रमुख उल्हास बिले आदी मान्यवर उपस्थित होते.

या मॅरेथॉनच्या यशस्वी होण्याकरिता या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम व मेहनत घेतली.


**मध्य रेल्वे**

**नोंदणी केलेली पार्सल्स आणि लगेज पॅकेजेसची यांत्रिक हाताळणी**

**कामाचे नाव :** सीपीएस/रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आलेल्या सूचनांनुसार पॅसेंजर, मेल/एक्सप्रेस गाड्यांच्या एसएलआरस/ब्रेक व्हॅन्स/एजीसी/ एलडब्ल्यूएलआरआरएम्ससाठी माल चढवणे/उतरवणे, सामान रचणे आणि हलवणे यांचा समावेश असलेले मुंबई सीएसएमटी व एलटीटी रेल्वे स्थानकांवर नोंदणी केलेल्या पार्सल्स आणि लगेज पॅकेजेसच्या यांत्रिक हाताळणीचे काम.

| स्थानक → | मुंबई सीएसएमटी | एलटीटी |
|---|---|---|
| खुली ई-निविदा - दोन बोली पद्धत, निविदा सूचना क्र. | बीबी/सी/१२४/पीएल हँड/सीएसएमटी/२० दिनांक ०६.०३.२०२० | बीबी/सी/१२४/पीएल हँड/ एलटीटी/२० दिनांक ०७.०३.२०२० |
| जीएसटीसह कामाचा अंदाजित खर्च | ₹ ५,०८,३२,८३७/- (₹ पाच कोटी आठ लाख बत्तीस हजार आठशे सदतीस मात्र) (जीएसटी धरून) | ₹ ४,०६,७३,३२८/- (₹ चार कोटी सहा लाख त्र्याहत्तर हजार तीनशे अठ्ठावीस मात्र) (जीएसटी धरून) |
| इसारा रक्कम/इ.अ.र. | ₹ ४,०४,२००/-(₹ चार लाख चार हजार दोनशे मात्र) | ₹ ३,५३,४००/- (₹ तीन लाख त्रेपन्न हजार चारशे मात्र) |
| निविदा प्रपत्राची किंमत (विना-परतावा) | ₹ १०,०००/- (₹ दहा हजार मात्र) (निविदा दस्तावेजाची किंमत आणि इ.अ.र. केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच प्रदान करावयाची) | ₹ १०,०००/- (₹ दहा हजार मात्र) (निविदा दस्तावेजाची किंमत आणि इ.अ.र. केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच प्रदान करावयाची) |
| निविदा अपलोडींगची अंतिम तारीख आणि वेळ व उघडणे | ०१.०४.२०२० रोजी दु. ३.०० वा. पर्यंत अपलोडिंग आणि ०१.०४.२०२० रोजी समाप्तीची वेळ झाल्यानंतर ताबडतोब उघडणार | ०८.०४.२०२० रोजी दु. ३.०० वा. पर्यंत अपलोडिंग आणि ०८.०४.२०२० रोजी समाप्तीची वेळ झाल्यानंतर ताबडतोब उघडणार |
| कामाचा पूर्तता कालावधी आणि प्रस्तावाची वैधता | कंत्राट केल्या तारखेपासून २ वर्षे, १२० दिवस | |
| बोली पूर्व सभेची तारीख, वेळ आणि ठिकाण | १९.०३.२०२० रोजी दु. ३.०० वा. डीसीएम (गुडस) ऑफिस मध्ये, रेल्वे रिझर्व्हेशन सेंटर वर, मुंबई सीएसएमटी. | |
| वेबसाईटचे तपशील | पुढील तपशिलांसाठी कृपया निविदा दस्तावेजांना **www.ireps.gov.in** वर पहा. | |

संदर्भित निविदेचे पुढील कोणतेही पुरकपत्र/शुद्धिपत्र, मुदत वाढ, स्पष्टीकरण इ. फक्त वेबसाईटमध्ये अपलोड केले जाईल. स्वतःला अवगत ठेवण्यासाठी बोलीदारांनी नियमितपणे वेबसाईटला भेट द्यावी.

1350

रेल्वे हेल्पलाईन १३९ | आरपीएफ सिक्युरिटी हेल्पलाईन १८२


epaper.freepressjournal.in